DAY — 15 SEAT NUMBER

| 2023 | III | 13 | 1500 | J-315 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# ECONOMICS (49)

Time : 3 Hrs. (8 Pages) Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.*

*(३) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(४) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.*

**प्र. १. (अ) खालील विधाने पूर्ण करा :** (५) [२०]

(i) सूक्ष्म अर्थशास्त्र या नावाने ओळखले जाते .......

(अ) उत्पन्न सिद्धांत (ब) किंमत सिद्धांत

(क) वृद्धी सिद्धांत (ड) रोजगार सिद्धांत

(ii) नाणे बाजारातील निधीच्या कमतरतेचे कारण .........

(अ) अपुरी बचत (ब) रोख रकमेची वाढती मागणी

(क) असंघटित क्षेत्र (ड) वित्तीय गैरव्यवस्था

(iii) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिता .......

(अ) वाढते (ब) स्थिर असते

(क) घटते (ड) शून्य असते

(iv) कोणत्याही शासनाच्या सार्वजनिक खर्चाची प्रवृत्ती ही .......

(अ) स्थिर असते (ब) वाढती असते

(क) घटती असते (ड) बदलती असते

(v) हलक्या प्रतीच्या वस्तूच्या बाबतीत उत्पन्न व मागणी यात .......

(अ) प्रत्यक्ष संबंध असतो
(ब) व्यस्त संबंध असतो
(क) कोणताही बदल नाही
(ड) प्रत्यक्ष आणि व्यस्त संबंध असतो

**(ब)** विसंगत शब्द ओळखा : (५)

(i) प्राप्ती संकल्पना :
एकूण प्राप्ती, सरासरी प्राप्ती, एकूण खर्च, सीमांत प्राप्ती

(ii) संख्यात्मक पतनियंत्रण साधने :
बँक दर, खुल्या बाजारातील रोख व्यवहार, परकीय विनिमय दर, रोकड निधीचे बदलते गुणोत्तर

(iii) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती :
वस्तूच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत, उत्पादन घटकाच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत, आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत, आर्थिक कल्याणाचे सिद्धांत

(iv) करेतर उत्पन्न :
शुल्क, दंड, संपत्ती कर, अधिभार

(v) साध्या निर्देशाकांचे प्रकार :
लासपेअरचा किंमत निर्देशांक, किंमत निर्देशांक, संख्यात्मक निर्देशांक, मूल्य निर्देशांक

**(क)** अर्थशास्त्रीय परिभाषिक शब्द लिहा : (५)

(i) एखादया विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवांचे दुहेरी मोजदाद होऊ न देता केलेले मापन होय.

(ii) अशी इच्छा, जिला खरेदी शक्तीचे पाठबळ आणि ते खर्च करण्याची मानसिक तयारी असते.

(iii) किंमतीतील बदलामुळे वस्तूच्या मागणीत घडून येणारा बदल.

(iv) प्रत्यक्ष व्यवहारात आढळून येणारा बाजाराचा प्रकार.

(v) स्वातीने पावसाळ्यात तिच्या वडिलांसाठी रेनकोट खरेदी केला.

**(ड)** विधाने व तर्क प्रश्न सोडवा : (५)

(i) विधान (अ) : पूर्ण स्पर्धेच्या बाजारात वस्तूची किंमत, मागणी आणि पुरवठ्याच्या समतोलातून ठरते.

तर्क विधान (ब) : असंख्य ग्राहक आणि विक्रेते असल्याने कोणतीही एक व्यक्ती किंमतीवर प्रभाव टाकू शकत नाही.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(ii) विधान (अ) : एका वस्तूच्या किंमतीतील बदल हा अन्य वस्तूच्या मागणीत बदल घडवतो.

तर्क विधान (ब) : उपभोक्त्याच्या उत्पन्नातील बदल हा वस्तूच्या मागणीत बदल घडवतो.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(iii) विधान (अ) : स्व: उपभोगासाठीचे उत्पादन राष्ट्रीय उत्पन्नात मोजले जात नाही.

तर्क विधान (ब) : स्व: उपभोगासाठीचे उत्पादन विक्रीसाठी बाजारात येत नाही.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(iv) विधान (अ) : व्यापारी बँकेअंतर्गत परकीय विनिमय व्यवस्थापन व नियंत्रण केले जाते.

तर्क विधान (ब) : भारतीय रिझर्व्ह बँकेला अधिकृत विनिमय दर कायम ठेवणे आणि त्याची स्थिरता टिकवावी लागते.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(v) विधान (अ) : पुरवठा ही सापेक्ष संकल्पना आहे.

तर्क विधान (ब) : पुरवठा नेहमी किंमत, वेळ आणि नगसंख्या या संदर्भात स्पष्ट केला जातो.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(अ) खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा (कोणतेही तीन) : [१२] (६)

(i) एका टेबल विक्रेत्याने ₹ २,००० प्रतिटेबल याप्रमाणे १५ टेबलची विक्री केली त्यापासून त्याला ₹ ३०,००० मिळाले.

(ii) इंग्लंडने भारतातून कापसाची आयात केली व त्यापासून कपडे तयार करून ते मलेशियात विकले.

(iii) अशोकने आपल्या उत्पन्नातून उत्पन्न व संपत्ती कर भरला.

(iv) राजूचे वडील त्यांचे पैसे देशातील आणि देशाबाहेरील एकत्रित समभाग आणि कर्ज अशा दोन्ही दीर्घमुदत निधीच्या बाजारपेढेत गुंतवितात.

(v) गरीब व्यक्तीला कार हवी आहे.

**(ब)** फरक स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) : (६)

(i) एकक लवचिक मागणी आणि जास्त लवचिक मागणी

(ii) राष्ट्रीय उत्पन्न मापनाची उत्पादन पद्धती आणि उत्पन्न पद्धती

(iii) मागणी ठेवी आणि मुदत ठेवी

(iv) साधा निर्देशांक आणि भारान्वित निर्देशांक

(v) साठा आणि पुरवठा

**प्र. ३.** **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही <u>तीन</u>) :** **[१२]**

(i) सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व कोणत्याही चार मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.

(ii) मागणीची किंमत लवचिकता मोजण्याची गुणोत्तर (शेकडेवारी) पद्धत स्पष्ट करा.

(iii) राष्ट्रीय उत्पन्नाची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(iv) भारतातील नाणेबाजाराच्या कोणत्याही चार समस्या स्पष्ट करा.

(v) घटत्या सीमान्त उपयोगिता सिद्धान्ताचे कोणतेही चार अपवाद स्पष्ट करा.

**प्र. ४.** **खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) :** **[१२]**

(i) पुरवठ्याच्या नियमाला कोणतेही अपवाद नाहीत.

(ii) व्यापारतोल आणि व्यवहारतोल या दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत.

(iii) निर्देशांक अर्थशास्त्रीय दृष्ट्या खूप महत्त्वपूर्ण आहे.

(iv) राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करतांना कोणत्याही प्रकारच्या तात्त्विक अडचणी येत नाहीत.

(v) स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे.

प्र. ५. खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [८]

(i) खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४)

| वस्तूचे नग | एकूण उपयोगिता | सीमांत उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ६ | ☐ |
| २ | ☐ | ५ |
| ३ | १५ | ४ |
| ४ | १५ | ☐ |
| ५ | ☐ | -१ |


प्रश्न :

(१) वरील तक्ता पूर्ण करा. (२)

(२) (अ) जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते तेव्हा सीमांत उपयोगिता – ☐ (१)

(ब) जेव्हा एकूण उपयोगिता घटते तेव्हा सीमांत उपयोगिता – ☐ (१)

(ii) आकृतीमधील 'अ इ' हा रेषीय मागणी वक्र आहे. आकृतीच्या आधारावर खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा : (४)




0318

(१) 'क' या बिंदूवर मागणी अधिक लवचिक आहे. (१)

(२) 'ब' या बिंदूवर मागणी एकक लवचिक आहे. (१)

(३) 'ड' या बिंदूवर मागणी संपूर्ण अलवचिक आहे. (१)

(४) 'अ' या बिंदूवर मागणी संपूर्ण लवचिक आहे. (१)

(iii) खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या : (४)

भौगोलिक स्थान वेळ या संदर्भात किंवा इतर वैशिष्ट्ये इत्यादीच्या सापेक्ष बदलासाठी किंवा बदलाचे प्रमाण दाखविण्यासाठी वापरले जाणारे तंत्र म्हणजे निर्देशांक होय.

निर्देशांक हा अर्थतज्ज्ञ, शेतकरी, व्यापारी, शासक, शिक्षणतज्ज्ञ आणि मजूर संघटनाचे पुढारी या सर्वांना आपआपल्या क्षेत्रातील योजना आखणे आणि कार्यान्वित करण्यासाठी एक अत्यंत उपयोगी साधन आहे.

निर्देशांकाची व्याप्ती एका विशिष्ट विषयापुरती सीमित न राहता ती अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, भूगोल इत्यादी यातही विस्तारलेली आहे.

निर्देशांक काढत असतांना आपणास निर्देशांक कशासाठी तयार करावयाचे आहेत याची उद्दिष्टे प्रथम निश्चित करावी लागतात व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी माहिती वेगवेगळ्या मार्गांनी गोळा करावी लागते व या माहितीचा वापर आपण ज्या काळासाठी तुलना करावयाची आहे त्या काळाच्या तुलनात्मक अभ्यासासाठी वापरला जातो. हे काढण्यासाठी आधार वर्षाची पातळी १०० मानली जाते व चालू वर्षाचा निर्देशांक काढला जातो.

निर्देशांक काढण्यासाठीच्या वेगवेगळ्या पद्धती लासपेअर, पाश्चे, फिशर यांनी सांगितल्या आहेत.

प्रश्न :

(१) निर्देशांकाचा अर्थ सांगा. (१)

(२) निर्देशांकाचा वापर कोणास होतो? (१)

(३) वरील उताऱ्याविषयी स्वमत लिहा. (२)

**प्र. ६.** **सविस्तर उत्तरे लिहा (कोणतीही दोन) :** [१६]

(i) मागणीचा नियम अपवादासह स्पष्ट करा.

(ii) मक्तेदारीचा अर्थ सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(iii) सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कारणे स्पष्ट करा.

◆◆◆